



# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२९१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १७ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## मी काय खेळणं आहे का? मुख्यमंत्री आग्रही होते पण...; पक्षातील सहकाऱ्यांवर छगन भुजबळ संतप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ नाशिक**

महायुती सरकारच्या मंत्रिमंडळ विस्तारानंतर मोठ्या प्रमाणात नाराजी नाट्य पाहायला मिळत आहे. जेष्ठ नेत्यांना मंत्रिपदे न मिळाल्याने अनेकांनी आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली आहे. यामध्ये सर्वात आघाडीवर भाजपचे सुधीर मुनगंटीवार आणि राष्ट्रवादीचे छगन भुजबळ यांचे नाव आहे. मंत्रीपद न मिळालेल्याने छगन भुजबळ संतप्त झाले आहेत. छगन भुजबळांनी सोमवारी अनेकवेळा माध्यमांसमोरच याबाबत नाराजी प्रकट केली. त्यानंतर आता नाशिकमध्ये पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतल्यानंतर भुजबळ यांनी



आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मी काय तुमच्या हातातील खेळणं आहे का असं म्हणत छगन भुजबळ यांनी पक्षातील प्रमुखांवर निशाणा साधला आहे.

मंत्रिपद न मिळाल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ हे नागपूर अधिवेशन सोडून नाशिकला रवाना झाले होते. राठा समाजाचे नेते मनोज जरागे यांच्याशी संघर्ष केल्याचे बक्षीस मिळाल्याची खंत भुजबळांनी व्यक्त केली होती. त्यानंतर आता नाशिकमध्ये भुजबळ यांनी पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेत आपली भूमिका स्पष्ट केली. त्यानंतर माध्यमांशी बोलताना माझं मंत्रीपद कुणी नाकारलं हे शोधावं लागेल असं छगन भुजबळ यांनी म्हटलं.

मंत्रीपद कुणी नाकारलं हे शोधावं लागेल. तोच प्रयत्न सुरु आहे. प्रत्येकाला मंत्रिपद पाहिजे असतं. प्रश्न मंत्रिपदाचा नाही. प्रश्न हा ज्या प्रकारे अवहेलना करण्यात आली त्याचा आहे. त्यासंदर्भात उद्या सांगणार आहे. त्यांनीच लोकसभेला उभं राहा सांगितले होते. होळीच्या दिवशी आम्हाला ताबडतोब बोलवून घेतलं आणि सांगितले की पंतप्रधान मोदींनी सांगितले आहे की नाशिकमध्ये भुजबळच उभे राहणार. त्यावेळी मी त्यांना उद्या सांगतो असं म्हटलं. त्यांनी तुमचे नाव सांगितल्याचे मला सांगण्यात आलं. एक महिना इथे आल्यानंतर सगळी तयारी झाली आणि चांगले वातावरण तयार झालं. ज्यांना नाशिकच्या विकासात रस आहे ते सगळे येऊन मला भेटून गेले. मी उभा राहणार असं सांगितले तर १५ दिवसांत नाव जाहीर करायचं होतं. सगळ्या महाराष्ट्राचे नाव जाहीर झालं पण माझं झालं नाही. मग मी माघार घेतो असं म्हटलं. मी तुमच्या तिकीटाकडे डोळे लावून बसणारा नाही, असं छगन भुजबळ म्हणाले.

मला कळलं की मुख्यमंत्र्यांनी माझा मंत्रिमंडळात प्रवेश असावा यासाठी आग्रह धरला होता. हे मी कन्फर्म करुन घेतलं आहे, असंही छगन भुजबळ म्हणाले.

प्रफुल्ल पटेलांना चार महिन्यांपूर्वी राज्यसभेवर जायचं म्हटलं होतं. त्यावेळी माझं ऐकलं नाही आणि आता सांगत आहेत. मी काय लहान खेळणं आहे का तुमच्या हातातलं. तुम्हाला वाटेल तेव्हा वर जा खाली बसा, आता निवडणूक लढवा सांगता. मी राजीनामा दिल्यानंतर माझ्या मतदारसंघातील लोकांना काय वाटेल. मी त्यांना सांगितले होते की मला जायचं आहे पण थोडे दिवस द्या. मतदारसंघामध्ये जी कामे आहेत ती पूर्ण करतो. लोकांची समजूत काढू आणि मग जाऊ. तुम्ही उठ आणि बस म्हणणार असाल तर छगन भुजबळ तसा मनुष्य नाही, असंही भुजबळांनी स्पष्ट केलं.

## भाजपा 'एक्शन' मोडवर..! निवडणुकीत पक्षविरोधी काम केलेल्या आमदाराला कारणे दाखवा नोटीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७ मुंबई**

लोकसभेसोबतच विधानसभा निवडणुकीत पक्षविरोधी प्रचार केल्याने भाजपाचे विधान परिषदेचे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांना पक्षाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. विधानसभा निवडणूक निकालानंतर राज्यात भाजपा महायुतीचं सरकार स्थापन झाले आहे. यंदाच्या निकालात भाजपाने १३२ जागा जिंकत इतिहास घडवला. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी पक्ष सोडून जाणारे आणि पक्षात राहून विरोधकांचा प्रचार करणारे यांची कोंडी झाली आहे.

सोलापूरातील रणजितसिंह मोहिते पाटील यांची हकालपट्टी करावी अशी मागणी



माळशिरसचे माजी आमदार राम सातपुते यांनी पक्षाकडे केली होती. लोकसभेत आणि विधानसभा निवडणुकीत रणजितसिंह मोहिते पाटलांनी पक्षाविरोधी काम केल्याचा आरोप त्यांनी केला. त्यानंतर आज भाजपाने मोहिते पाटलांना कारणे दाखवा नोटीस पाठवली त्यात पक्षशिस्त भंग करणारे कृत्य वारंवार केल्याचे पक्षाच्या निदर्शनास आले आहे.

## उद्धव ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची भेट घेतली, दोघांमध्ये ६-७ मिनिटे चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ नागपूर :**

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालानंतर महायुतीच्या सरकारचा शपथविधी संपन्न झाला. त्यावेळी, मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांनी फोन करुन राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा शरद पवार आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनाही शपथविधी सोहळ्याचे निमंत्रण दिले होते. मात्र, या दोन्ही नेत्यांची शपथविधी सोहळ्याला अनुपस्थिती होती. मात्र, विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्याच दिवशी उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली. या भेटीत मुख्यमंत्री



झाल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचं अभिनंदनही केलं. यावेळी, आमदार आदित्य ठाकरे, अनिल परब आणि वरुण सरदेसाई हेही उद्धवठ ठाकरेंच्यासोबत होते. एकीकडे भाजपकडून शिवसेना एकनाथ शिंदेंना दाबलं जात असल्याचा आरोप होत असताना दुसरीकडे उद्धव ठाकरेंनी घेतलेल्या भेटीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, या भेटीत दोन्ही नेत्यांमध्ये ६-७ मिनिटं चर्चा झाली.

नागपूर येथे हिवाळी अधिवेशन सुरू असून उद्धव ठाकरे देखील आज विधिमंडळात आले होते. नागपूरमध्ये येताच सर्वप्रथम त्यांनी पत्रकार परिषद घेऊन राज्य सरकारवर व महायुतीच्या नेत्यांवर टीका केली. लाडकी बहीण योजना, मंत्रिमंडळ विस्तारातील नाराजी, ईव्हीएम, निवडणूक आयुक्त यांसह विविध मुद्द्यांवर उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषदेतून भाष्य केलं. त्यानंतर, ते थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी यांच्या भेटीसाठी मुख्यमंत्र्यांच्या दालनात पोहोचले. उद्धव ठाकरेंची ही भेट राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली असून शिंदे गटातील नेत्यांमध्ये देखील या भेटीनं आश्चर्य व्यक्त होत आहे.

**ही सदिच्छा भेट**

ही केवळ सदिच्छा भेट होती, आम्ही निवडणूक जिंकू शकलो नाही, महायुती निवडणूक जिंकलीय. त्यामुळे आता महाराष्ट्राच्या हिताची काम होतील अशी अपेक्षा आहे. हे सरकार कसं आल ते आम्ही जनतेच्या माध्यमातून आवाज उठवणार आहोत, असे उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांच्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हटले.

**राजकीय पक्ष म्हणून आम्ही शुभेच्छा दिल्या**

आम्ही आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विधानभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांची भेट घेतली आहे. हे ईव्हीएम सरकार आहे, ईव्हीएमवर संशय आहे तो आहे. राजकीय पक्ष म्हणून आम्ही त्यांना शुभेच्छा दिल्यात, महाराष्ट्राच्या हितासाठी काम करावं राज्याच्या हिताच्या सूचना आम्ही करु, अशी प्रतिक्रिया आदित्य ठाकरे यांनी या भेटीनंतर दिलीय.

## छगन भुजबळांनी अद्याप संपर्क केला नसला तरी भुजबळ अधून माझ्या संपर्कात असतात : उद्धव ठाकरे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर ९**

मंत्रिमंडळात समावेश करण्यात न आल्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ नाराज झाले आहेत. त्यांनी नाराजी व्यक्त केली असून, चर्चा करून पुढचा निर्णय घेऊन अशी भूमिका मांडली. त्यामुळे भुजबळ अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस सोडणार, अशी चर्चा रंगू लागली आहे. शिवसेनेचे (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना छगन भुजबळ यांच्याबद्दल प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी भुजबळांसोबत जे घडलं ते फार वाईट आहे, असे म्हटले.

नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाला उद्धव ठाकरे यांनी हजेरी लावली. यावेळी उद्धव ठाकरेंनी माध्यमांशी संवाद साधला. मंत्रिमंडळ विस्तारात संधी न मिळालेल्यांना ठाकरेंनी चिमटा काढला.

उद्धव ठाकरे म्हणाले, मंत्रिमंडळाचा विस्तार झाला, पण विस्तारापेक्षा मंत्रिमंडळाच्या वजाबाकीची चर्चा अधिक रंगली आहे. मंत्रिपद मिळालेल्यांच्या फटाक्यांपेक्षा नाराजांचे बार जास्त वाजत आहेत.




मंत्रिमंडळ विस्तारानंतर मुख्यमंत्री सहकाऱ्यांचा परिचय सभागृहाला करून देतात. मला वाटतं ही पहिली वेळ असेल की, ज्यांच्यावर ढीगभर पुरावे देऊन आरोप केले. ज्यांच्यावर ईडीच्या धाडी पडल्या, त्यांचा मुख्यमंत्र्यांना सहकारी म्हणून ओळख करून द्यावी लागली. हे कोणते आणि कसे सरकार आहे?, असा टोला ठाकरेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लगावला.

भुजबळांच्या नाराजीकडे उद्धव ठाकरेंचं लक्ष वेधण्यात आलं. तुमच्याकडे आले, तर त्यांना घेणार का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर ठाकरे म्हणाले, असं काही नाही. ते काही बोलले तर मी उत्तर देईन. आपण कशाला त्यावर बोलायचं. भुजबळांबद्दल मला फार वाईट वाटलं. अशा अनेक जणांबद्दल मला आतून वाईट वाटतंय. अपेक्षांनी ते तिकडे गेले होते, असे ठाकरे म्हणाले.

छगन भुजबळांनी अद्याप संपर्क केला नसला तरी भुजबळ अधून माझ्या संपर्कात असतात, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

**अनेकांचे निरोप येत आहेत : उद्धव ठाकरे**

मला कुणीतरी विचारलं की कुणी संपर्कात आहेत का? अनेकजणांचे निरोप येताहेत. त्यांना आता कळतंय की, माझी भूमिका बरोबर होती. शेवटी अनुभवासारखा उत्तम गुरू नसतो. तो गुरू त्यांना मिळालेल्या आहे. त्यातून त्यांना शिकवणूक मिळू द्या, त्यातून ते सुधरले तर मग आपण बघू, अशी भूमिका उद्धव ठाकरेंना मांडली.

## हिंदू रक्षा समिती गोवा तर्फे हिंदू शेरणी माजी खा. नवनीत रवि राणा प्रमुख वक्ता म्हणून विशेष आमंत्रण

### गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आग्रहाने आमंत्रित केले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

बांग्लादेशामध्ये गेल्या अनेक दिवसापासून हिंदू समाजावर अन्याय पूर्वक व अतिशय क्रुर पद्धतीने अत्याचार होत आहे. या घटनेची प्रतिक्रिया संपूर्ण भारतामध्ये सुद्धा उमटत आहे. गोवाची राजधानी पणजी पासून अवघ्या ३० कि.मी. अंतरावर असलेले फोंडा हे गाव असून या गावामध्ये आरएसएस, विएचपी, बजरंग दल अशा सर्व हिंदुत्ववादी संघटनांचे सदस्य, हितचिंतक एकत्र येऊन त्या ठिकाणी हिंदु रक्षा समितीची स्थापणा केली आहे. याच हिंदु रक्षा समितीद्वारे गोवर्धन भवन खडपाबांध फोंडा येथे १९ डिसेंबर २०२४ दुपारी ४



वाजता हिंदु युवक-युवतीची जागृती फेरी तसेच सायंकाळी ५ वाजता भव्य जाहीर सभेचे आयोजन केले आहे. संपूर्ण भारतभर हिंदु शेरणी म्हणून प्रसिद्ध असलेल्या अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणा यांनी संपूर्ण भारतात हिंदुत्व जागृत करण्यासाठी विशेष योगदान दिले आहे. त्यामुळे मा.खा. नवनीत रवि राणा सारख्या हिंदु शेरणीला हिंदुत्वाचा हुंकार भरण्याकरिता गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोदजी सावंत तसेच हिंदु रक्षा समितीद्वारे आयोजित जागृती फेरी व जाहीर सेभेमध्ये प्रमुख वक्ता म्हणून विशेष आमंत्रित केले आहे. हे खऱ्या अर्थान संपूर्ण अमरावती जिल्हा, विदर्भ व महाराष्ट्रातील हिंदुत्वासाठी गौरवाची बाब आहे.

## विधानसभेत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील अन् भास्कर जाधवांमध्ये जुंपली; नेमकं काय घडलं?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**

विधानसभेत राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या अभिभाषणावरील चर्चेवेळी ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव आणि मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात चांगलीच जुंपली. राज्यपालांच्या अभिभाषणात त्यांनी ६० वेळा माझं सरकार असा उल्लेख केला. हे तुमचे सरकार कसे झाले याचा विचार करा. सरकार कुठलेही असले तरी ते राज्यपालांना ते म्हणावे लागते. राज्यपाल हे एका पक्षाचे आहेत परंतु त्यांनी पदाचा मानसन्मान राखला पाहिजे असं विधान ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी केले. त्यावर मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्यमंत्री आशिष जैस्वाल आणि भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी आक्षेप घेत विरोधक वैफल्यग्रस्त झालेत असा टोला लगावला. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील खडाजंगीत विधानसभा तालिका अध्यक्षांनी भास्कर जाधव यांचे विधान रेकॉर्डवरून काढून टाकण्यात आदेश दिले.

राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा करताना भास्कर जाधव यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. ते म्हणाले की, या सरकारने ५ डिसेंबर २०२४ रोजी संध्याकाळी ५ वाजता शपथ घेतली. सर्वसाधारणपणे राज्यात निवडणूक झाली, सरकार अल्पमतात आले, मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला तर राज्यातील सर्वात जास्त आमदार असलेल्या पक्षाला राज्यपालांनी निमंत्रित करावे लागते. राज्यपालांनी निमंत्रित केले नाही तर जो पक्ष सरकार बनवू इच्छितो त्यांनी आपल्याला समर्थन देणाऱ्या पक्षांची, आमदारांची यादी घेऊन राज्यपालांकडे जावे लागते. राज्यपालांना सांगावे लागते, आम्ही



सरकार बनवू इच्छितो, आम्हाला निमंत्रित करा. जर ते गेले नाहीत मोठ्या पक्षाला विचारायचं असते, आपण सरकार बनवू इच्छिता का? सरकार बनवताना राज्यपाल महोदयांनी तारीख जाहीर करायची असते. या तारखेला, या वेळेला नवीन सरकारला शपथ देता येईल हे राज्यपालांनी सांगायचे असते. जागा बदलायची असेल तर राज्यपालांना विनंती करावी लागते. राज्यपाल हे घटनात्मक आणि संविधानिक पद आहे असं म्हटलं जातं. मी टीका करत नाही परंतु आपण घटनेचे महत्त्व किती किमी करतोय. तुमच्या मनात घटनेबद्दल आदर नाही हे आम्ही सातत्याने सांगतोय. राज्यपाल पद हे घटनात्मक पद आहे की नाही याचे उत्तर मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उत्तराच्या भाषणात दिले पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

तसेच राज्यपालांनी तुम्हाला कधी बोलवले, राज्यपालांकडे तुम्ही यादी घेऊन कधी गेलात हे महाराष्ट्राला सांगितले पाहिजे. राज्यपालांकडे तुम्ही गेलात नाही ही माझी माहिती आहे. देवेंद्र फडणवीस यांची निवड कधी झाली, ४ डिसेंबर २०२४ रोजी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी त्यांच्या उपस्थितीत भाजपाची बैठक झाली. त्यात निवड झाल्यानंतर तिन्ही पक्षाचे नेते राज्यपालांकडे गेले आम्हाला शपथ घ्यायची आहे. पण प्रत्यक्षपणे आझाद मैदानात शपथविधीच्या मंडपाचे काम सुरू झाले. तिथे शपथविधी घ्यायचा हे कुणी ठरवले, राज्यपाल हे घटनात्मक पद असेल तर त्याचा अधिकार काय हा माझा धोरणात्मक प्रश्न आहे. २२ मुख्यमंत्री, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री, केंद्रीय मंत्री येणार आहेत त्यांच्या तारखा जाहीर झाला. दौरा निश्चित झाला तरीही राज्यपालांकडून कुठल्याही प्रकारे शपथविधीची अधिसूचना निघाली नाही. राज्यपालांना इतके गृहित धरता, राज्यपाल कुठल्यातरी एका पक्षाचे असतात हे मला मान्य आहे पण त्या खुर्चीवर बसल्यानंतर किमान त्या पदाची गरिमा, मानसन्मान राहिला पाहिजे. या पदाचे महत्त्व राहिले पाहिजे याचे भान राज्यपालांना आहे की नाही...? असा सवाल उपस्थित केला.

## संपादकीय ......

# वाद्य संगीतातील महान तपस्वी

*तबला या वाद्य संगीतातील महत्त्वाच्या वाद्याला जगभरात प्रसिद्धी, लोकप्रियता आणि सन्मान मिळवून देण्याचे अद्वितीय कार्य करणाऱ्या पंडित झाकीर हुसैन यांच्या निधनाची वार्ता अखेर ती खरी ठरली आणि नियतीनं एक महान तबलावादक हिरावून नेला.रिपिपवळीं*

*तबला म्हणजे उस्ताद झाकीर हुसैन हे समीकरण वर्षानुवर्षं पाहायला मिळतं यातच त्यांचं श्रेष्ठत्व दडलेलं आहे. त्याचबरोबर कलाकारानं कसं वागावं, कसं वावरावं आणि रंगमंचावरून कसं बोलावं याचा आदर्श झाकीरभाईंनी घालून दिला. हा आदर्श प्रत्येक कलाकारासाठी त्यांच्या पश्चातही खूप मोठी शिकवण म्हणून पाहिला गेला पाहिजे.*

*वाद्य संगीतातील तबला या वाद्याला वैश्विक मिळवून देण्याचे अद्वितीय कार्य करणाऱ्या पंडित झाकीर हुसैन यांच्या जाण्याचं वृत्त दुर्दैवानं खरं ठरलं आणि नियतीनं एक महान तबलावादक आपल्यापासून हिरावून नेला. सत्तरीनंतरच्या काळात संगीत क्षेत्रात, कला क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात अशी काही व्यक्तिमत्त्वं पाहायला मिळाली जी त्या क्षेत्राला, प्रकाराला समानार्थी शब्द बनून गेली.*

*सामान्य माणसापर्यंत एखादं वाद्य कसं पोहोचतं याचं हे अद्वितीय उदाहरण म्हणावं लागेल. तबला हे साधीचं वाद्य न राहता त्याला स्टेजवरील मधली जागा मिळणं हे सौभाग्य पंडितजींमुळं लाभलं. भारतामध्ये तबलावादकाला ग्लॅमर मिळण्याची प्रक्रियाच मुळी पंडित झाकीर हुसैन यांच्यापासून सुरू झाली आणि ही खूप महत्त्वाची बाब आहे, असं मला वाटतं.*


*पंडितजींचं आणखी एक महत्त्वाचं योगदान म्हणजे, आंतरराष्ट्रीयस्तरावर तबला हा केवळ शास्त्रीय संगीतामधलं किंवा सिनेसंगीतामधलं एक वाद्य म्हणून पाहिला जात होता; पण एका इंटरनॅशनल कोलॅबरेशनमध्ये तबला हे वाद्य आणि तबला व ड्रम्स यासारखी इतर वाद्यं एकत्र वाजणं आणि त्याला ग्रॅमीसारखे नामांकित अ‍ॅवॉर्डस् मिळणं यातून जगभरात तबल्याचा नाद प्रस्थापित होणं, त्याला वैश्विक दर्जा मिळणं हे पंडितजींमुळं शक्य होऊ शकलं.*


*सातासमुद्रापार जगभरातल्या लोकांच्या कानात तबल्याचा ध्वनी प्रस्थापित करण्यामध्ये पंडितजींचा सगळ्यात महत्त्वाचा वाटा आहे; अन्यथा आंतराष्ट्रीय पातळीवर तबला हे केवळ क्लासिकल म्युझिकमधलं वाद्य म्हणूनच ओळखला गेला असता; पण आज तशी स्थिती नाहीये. परदेशी संगीतांमध्येही तबल्याचा वापर केला जातो आणि विदेशातील अनेकजण तबला तन्मयतेनं शिकताना, वाजवताना आणि ऐकताना दिसतात. जसं पंडित रविशंकरजी यांनी सतारवादनाला वैश्विक ओळख मिळवून दिली तशाच प्रकारे झाकीरभाईंनी तबल्याला ओळख, प्रतिष्ठा मिळवून दिली.सुदैवानं, मी झाकीरभाईंचे अनेक कार्यक्रम प्रत्यक्ष पाहिले आहेत आणि त्यातून मंत्रमुग्ध होण्याची संधीही मला मिळाली. लहान असताना सवाई गंधर्व महोत्सवामध्ये जायचो तेव्हापासून त्यांच्या तबलावादनाचे अवीट ध्वनी माझ्या कानावर पडत आले आहेत. यामध्ये सोलो परफॉर्मन्सही पाहिले आहेत आणि साथही पाहिली आहे; पण साथीच्या वेळी साथ आणि सोलोच्या वेळी सोलो, हे झाकीर भाईंना अचूकरीत्या जमत होतं.त्यांना शब्दांपासून सगळ्याचीच जाण असल्यामुळं ठुमरीला कशी साथ द्यायची, गझलला कशी साथ द्यायची आणि वाद्य संगीताला कशी साथ द्यायची याची अचूक जाण होती. यामुळं त्यांचं वाजवणं कधीच बोजड आणि तांत्रिक वाटलं नाही. अशा या महान तबलावादकाचा लाईव्ह परफॉर्मन्स पाहण्याचा योग आता कधीच येणार नाही, याची सल मनाला सतत राहील आणि तालाचं हे आवर्तन समेवर येण्यापूर्वी असं का थांबलं, हा प्रश्न बोचत राहील.*

# चला आमझरीला... साहसी खेळ खेळायला...

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती,–** थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेल्या चिखलदराजवळील आमझरी आणि भीमकुंड येथे साहसी खेळाची सुविधा निर्माण करण्यात आली आहे. जायंट स्वींग, झिप लाईनसह ४०० मीटरवरील स्काय सायकलींग क्रीडा प्रकाराने युवा पर्यटकांना भूरळ घातली आहे. याठिकाणी असलेल्या उत्तम सुविधांमुळे वर्षभर पर्यटकांची गर्दी दिसून येत आहे.चिखलदरापासून ५ किलोमीटर अंतरावर आमझरी मधाचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे. अडीचशे लोकसंख्या असलेल्या गावाने मध उत्पादन वाढीसाठी विविध प्रयोग केले आहेत. पूर्वी विविध प्रजातींच्या आंब्यांसाठी प्रसिद्ध असलेल्या आमझरी या गावात आजही अनेक जातींचे आंबे चाखायला मिळतात. आंब्यासोबतच रानमेव्यांमध्ये जांभुळ, मोहफुल हेही या गावाचे विशेष आकर्षण आहे. अशा विविध कारणासाठी प्रसिद्ध असलेल्या आमझरी गावात साहसी खेळांसाठी विशेष उपक्रम राबविण्यात आला आहे. यामुळे हे ठिकाणी दूरवर प्रसिद्धीस येत आहे.वन विभागातर्फे सुमारे एक कोटी रूपये खर्चून पर्यटकांचे आकर्षण असलेल्या साहसी खेळांची व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. साहसी खेळ प्रकारात आमझरी येथे बंजी इजेक्शन, ह्युमन गायरो, ४०० मीटर झिप लाईन, २५० मीटर स्काय सायकल, ४० फुट क्लायंबिंग वॉलची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच चिखलदारा





येथील प्रसिद्ध असलेल्या भीमकुंड येथे ४६० मीटर झिप लाईन, ४०० मीटर स्काय सायकल, जायंट स्विंग तयार करण्यात आले आहे. येथे साहसी खेळांसाठीची नोंदणी ऑफलाईन आहे.याठिकाणी पर्यटकांच्या सुविधेसाठी निवासाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. यासाठी पाच एक्झीक्युटीव्ह टेंट, आठ टेंट, चार कॉटेजेस, १० बेडची डॉरमेटरी, एक कॅन्टीन, ४० आसन क्षमतेचे एक ऑडीटोरीयम आदी सोयीसुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. यामुळे पर्यटकांना भोजन आणि निवासाची उत्तम व्यवस्था उपलब्ध होत आहे. मुक्कामासाठी ारसळलरश्राशश्रसहरीं.ळप या वेबसाईटवर बुकींग करावे लागणार आहे. विशेष म्हणजे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मध्ये उल्लेख केलेले प्रकाश होमस्टे आमझरी गावातच आहे.सुमारे १० हेक्टरवरील आमझरी साहसी खेळ प्रकल्पाला सन २०१९-२० मध्ये सुरवात करण्यात आली. साधरणत: एक वर्षाच्या काळात प्रकल्प कार्यान्वित झाला. वर्षभर पर्यटकांचा ओघ या ठिकाणी असला तरी प्रामुख्याने पावसाळा आणि हिवाळ्यातील जुलै ते जानेवारी या कालावधीत मोठ्या प्रमाणावर पर्यटक भेटी देत आहेत. प्रामुख्याने शालेय सहलींचे याठिकाणी मोठ्या प्रमाणावर आयोजन करण्यात येते. पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेता भीमकुंड येथे यावर्षीपासून तीन साहसी क्रीडा प्रकार सुरू केले आहे.जिल्हा नियोजन समितीचा निधी आणि सामाजिक उत्तरदायीत्वाच्या निधीतून हे क्रीडा प्रकार सुरू करण्यात आले आहेत. युवकांचे विशेष आकर्षण असलेल्या साहसी क्रीडा प्रकारामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. आमझरी येथे पर्यटकांना पोहोचायचे असल्यास चिखलदरा ते घटांग रस्त्याने जावे लागते. तसेच भीमकुंड हे आमझरीपासून सुमारे आठ किलोमीटर अंतरावर आहे. याठिकाणी पर्यटकांनी भेटी द्याव्यात, साहसी क्रीडा प्रकारांची त्यांना माहिती व्हावी, यासाठी प्रशासनातर्फे विशेष पुढाकार घेण्यात येत आहे. याठिकाणी इतर उत्तम सुविधा निर्माण करण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्यात येत आहेत.

# किण्वित सेंद्रिय खत अर्थात एफ ओ एम ठरतंय शेतकऱ्यांसाठी वरदान वाचा सविस्तर

**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक** आपल्या देशामध्ये रासायनिक खताची निर्मिती व वापर होण्यापूर्वी लेंडी खत, शेणखत, मासळीचे खत, काडीकचरा यांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असे. त्यावेळी एकत्र कुटुंब पद्धती होती व घरामध्ये जनावरांची संख्या ही भरपूर होती.

पुढे काळाच्या ओघात विभक्त कुटुंब पद्धतीमुळे गुरांची जोपासना पूर्वीसारखी करणे शक्य न झाल्यामुळे गुरांची संख्या कमी झाली, आणि शेतीमध्ये सेंद्रिय पदार्थांचा वापर करणे कमी झाले कृषी विद्यापीठांची शिफारस विविध पिकांसाठी सर्वसाधारण दहा ते वीस बैलगाड्या शेणखत बरोबर नत्र, स्फुरद, पालाश यांच्या शिफारसी प्रती एकर असे.

जशी सेंद्रिय खतांची मात्रा शेतीसाठी कमी झाली तसा शेतकऱ्यांनी त्यांचे उत्पादन वाढवण्यासाठी रासायनिक खत वापरावर जास्त भर दिला. हरितक्रांतीनंतर शेतीमध्ये संकरित वाणांचा व रासायनिक खतांचा वापर पिक उत्पादन वाढीसाठी खूप प्रमाणामध्ये वाढला. त्यामुळे काही काळ त्यांचे उत्पादन वाढत गेले. परंतु पुढे केवळ रासायनिक खताचा वापर वाढवला तरी, तितके उत्पादन येत नसल्यामुळे त्याचे आर्थिक गणित बिघडले. शेतीमध्ये सेंद्रिय पदार्थांचा वापर कमी झाल्यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होत गेले.

सेंद्रिय कर्बाचे प्रमाण कमी होत गेल्यानंतर जमिनीमध्ये पिकांसाठी आवश्यक असलेल्या सूक्ष्मजीवांची संख्या सुद्धा कमी होत गेली. कालांतराने त्या जमिनीचा उत्पादन क्षमता कमी झाली. जमिनीचे आरोग्य धोक्यात आले.

या बाबींचा विचार करून भारत सरकारने ही योजना जमिनीचे आरोग्य व सुपीकता वाढविण्यासाठी राज्य व केंद्रशासित प्रदेश यांना अनुदान देऊन पर्यायी खते जसे की सेंद्रिय अथवा जैविक खतांचा वापर वाढावा यासाठी कार्यान्वित करण्यात आली.

कृषी विभागाने यासाठी रासायनिक खत पुरवठा करणाऱ्या मोठ्या खत कंपन्या जसे की इफको, कृभको, आरसीएफ यांना या खताची विक्री करणे विषयी सूचना दिल्या. या योजनेअंतर्गत, भारत सरकारने किण्वित सेंद्रिय खत अर्थात एफ ओ एम साठी प्रति टन रुपये पंधराशे इतकी रक्कम बाजार विकास सहकार्यासाठी पुरवठादार/उत्पादक यांना देऊ केली.

वनस्पती अथवा प्राण्यांचे अवशेष कुजवून रपौेलळल पद्धतीने आंबविल्यानंतर जे खत तयार होते, त्याला किण्वित सेंद्रिय खत असे म्हणतात. आंबवण्याच्या क्रियेमध्ये ईस्ट, लाईम, लॅक्टिक ऍसिड बॅक्टेरिया आणि या तऱ्हेच्या जवळपास ८० सूक्ष्म जीवांच्या प्रजाती इत्यादी चे मिश्रण केले जाते.




### FOM चे विशेष फायदे

१) यामुळे जमिनीची पाणी धारण क्षमता वाढते.

२) यामुळे जमिनीची सच्छिद्रता वाढते.

मातीशास्त्र व कृषी रसायनशास्त्र कृषी संस्था नैनी तसेच सॅम हिंगिनबोटम तंत्रज्ञान व शास्त्र कृषी विद्यापीठ प्रयागराज ,उत्तर प्रदेश यांनी संयुक्तपणे हिरवा वाटाणा या पिकावर एफ ओ एम आणि माईकोरीयजा यांचा मातीवर होणाऱ्या भौतिक व रासायनिक परिणामांचा अभ्यास करून काही नोंदी नोंदवल्या. त्या पुढीलप्रमाणे: जमिनीची सच्छिद्रता ४४.६८% वरून ५२.८१ टक्क्यापर्यंत वाढली म्हणजेच ७.१९% वाढली व पाणी धारण क्षमता ४३.५२% वरून ४८.५३% म्हणजेच पाच टक्के इतकी वाढली.

३) यामुळे जमिनीतील जिवाणूंची गुणवत्ता व संख्या वाढते. हे जिवाणू जमिनीतील अन्नद्रव्याचे खनिजे मध्ये रूपांतर करून पिकांना जास्तीत जास्त उपलब्ध करून देतात.

४) यामुळे जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे विघटन होऊन त्यांची साधी संयुगे तयार होतात, जी पिकांकडून सहजपणे शोषली जातात .त्यामुळे अन्न शोषण क्षमता वाढते.

५) पिकांची रोगप्रतिकारक क्षमता वाढते व पीक निरोगी राहते.

६) मिथेन अथवा कार्बन डाय-ऑक्साइड सारखे आरोबिकल वायू टाळले जात असल्यामुळे हे पर्यावरण पूरक आहे.

७) यामुळे रासायनिक खताची मात्रा निश्चितच कमी करता येते.

८) पीक उत्पादनाचा दर्जा व चव सुधारते.

९) हे खत १००% सेंद्रिय असल्यामुळे, यातील अन्नद्रव्य ही पिकांच्या गरजेनुसार सोडली जातात. त्यामुळे पिकावर कोणताही ताण येत नाही.

१०) या खत वापरामुळे आपल्या देशाची आयातीत खतावर जाणारी रक्कम कमीत कमी बारा हजार कोटी रुपये वाचवता येऊ शकते. कॉम्प्रेस बायोगॅसमुळे आपल्याला एनर्जी मिळू शकते.

११) यामुळे पिकांची व्यवस्थित वाढ होतेच व त्याबरोबर जमिनीतील कार्बन नत्र गुणोत्तर सुद्धा सुधारते.

१२) पिकांचे उत्पादन वाढते.

१३) शेणखत वापराचे ऐवजी हे खत वापरल्याने मजूर व वाहतुकीचा खर्च वाचतो.

१४) शेण खताचा वापर करताना त्यामधून गवताचे बी शेतात जाऊ शकते या खत वापरामध्ये ही शक्यता अजिबात नाही.

यासंबंधी नेदरलँडमध्ये कृषी उत्पादन करणाऱ्या ग्रीटोन या संस्थेचे संचालक अँड्रयूसिन कॉक त्यांनी पुढील निरीक्षणे नोंदविली आहेत. जिथे फक्त कंपोस्ट खताचा वापर केलेला होता तेथील गवत कापल्यानंतर सहा आठवड्यांनी ६० टक्क्यांनी कमी झालेले दिसले. तर जेथे एफ ओ एम वापरले होते. तेथील वजन फक्त तीन टक्क्यांनी कमी झालेले दिसले.

कार्बन ते नत्र या प्रक्रियेमध्ये गुणोत्तर १०:१ पासून १९:५ असे होऊन पीक वाढीसाठी ते उपयुक्त झाले. हे जमिनीतील सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण आणि सुपीकतेसाठी महत्त्वाचे सूचक आहे.

ग्रीटोन आणि फीड इनोवेशन सर्विसेस, वांगनियन यांनी केलेल्या प्रारंभिक स्वतंत्र चाचण्यांमध्ये असे दिसून आले आहे की, सेंद्रिय कचरा आंबल्याने कार्बन आणि सेंद्रिय पदार्थांचे नुकसान लक्षणीयरीत्या कमी होते, ज्यामुळे पुढील पिकांना अधिक पोषण द्रव्य उपलब्ध होतात.




# सकाळी उठल्यावर लगेच 'हे' करा! तब्येत राहील ठणठणीत, वजनही राहील आटोक्यात


**दि.१७ विदर्भ प्रजासत्ताक**आपण हल्ली बघत आहोत की प्रत्येकाच्याच आरोग्याच्या तक्रारी खूप वाढल्या आहेत. कोणाला सिडीटीचा त्रास होतो तर कोणाचे वजन कमीच होत नाही. कमी वयातच अनेकांच्या मागे बीपी, शुगर, हृदयविकार असा त्रास लागला आहे. असे बरेचसे त्रास कमी करायचे असतील आणि वजन आटोक्यात ठेवायचे असेल तर झोपेतून उठल्यावर रिकाम्यापोटी १ ग्लास गरम पाणी प्यावे, असा सल्ला आहारतज्ज्ञ देत आहेत (best method to keep ourself healthy and fit). या पाण्यात कोणते पदार्थ टाकायचे आणि त्याने आरोग्याला काय फायदा होऊ शकतो, (health benefits of having warm water in morning every day)

**सकाळी रिकाम्यापोटी गरम पाणी पिण्याचे फायदे**– रिकाम्यापोटी कोमट पाणी प्यायल्यास त्याचे आरोग्याला काय फायदे होऊ शकतात आणि ते गरम पाणी नेमकं कोणत्या पद्धतीने प्यायला हवं, याविषयी माहिती सांगणारा व्हिडीओ षेवळशक्षरलश्ररूपीं या इन्स्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आला आहे.

यामध्ये असं सांगण्यात आलं आहे साधं गरम पाणी जर तुम्ही रिकाम्यापोटी प्यायलं तर ते आरोग्यासाठी चांगलंच आहे. पण जर गरम पाण्यात तुम्ही चिमूटभर किसलेलं आलं, हळद, मिरेपूड, १ टीस्पून तूप असं सगळं साहित्य घालून ते प्यायलं तर ते अधिक उत्तम.

यासाठी पाणी पातेल्यात टाकून गॅसवर गरम करायला ठेवा. त्यात हळद, मिरेपूड, आलं घाला आणि पाण्याला एक उकळी येऊ द्या. त्यानंतर हे पाणी जेव्हा पिता येण्याजोगं होईल तेव्हा ते एका ग्लासमध्ये गाळून घ्या आणि त्यात तूप टाकून प्या.

**रिकाम्यापोटी कोमट पाणी का प्यावं ?**– १. रात्रभर आपण पाणी प्यायलेलं नसतं. त्यामुळे आपल्याला डिहायड्रेशनचा त्रास होऊ नये म्हणून



सकाळी सगळ्यात आधी गरम पाणी प्यावं.

२. गरम पाणी प्यायल्यामुळे पचनक्रिया, चयापचय क्रिया अधिक चांगली होते. यामुळे शरीरावर अतिरिक्त चरबी साठून राहण्याचे प्रमाण बरेच कमी होते.

३. हळद आणि आल्यामध्ये असणारे ण्टीबॅक्टेरियल घटक शरीर निरोगी राहण्यासाठी आणि शरीरावरची सूज कमी करण्यासाठी मदत करतात.

मोत्याच्या जोडव्यांचे सुंदर डिझाईन्स- नव्या नवरीसाठी नवी फॅशन, घ्या काहीतरी वेगळं- एकदम युनिक

४. गरम पाण्यात मिरेपूड, हळद, आलं टाकून प्यायल्याने कफ, सर्दीचा त्रास होत नाही. तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

५. गरम पाण्यात जर लिंबाचा थोडा रस टाकून प्यायलं तर त्यामुळे शरीराला व्हिटॅमिन सी मिळते. आरोग्यासोबतच त्वचेचं सौंदर्य टिकून ठेवण्यासाठीही मदत होते.

# महिला तक्रार निवारण समितीची स्थापना करावी-महिला व बाल विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ अमरावती–** कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (संरक्षण, प्रतिबंध आणि मनाई) अधिनिय-२०१३ अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक शासकीय , निमशासकीय कार्यालयामध्ये तसेच खाजगी दुकाने, आस्थापना, शाळा-महाविद्यालय, हॉटेल्स, उद्योग, दवाखाने इत्यादी ठिकाणी ज्या आस्थापनेवर दहा किंवा दहापेक्षा जास्त कर्मचारी कार्यरत आहेत , अशा प्रत्येक कार्यालयामध्ये अंतर्गत तक्रार निवारण समितीची स्थापना करुन याबाबतची माहिती ऑनलाईन करण्याचे आवाहन महिला व बालविकास विभागाने केले आहे. समितीमध्ये कार्यालयातील वरिष्ठ महिला अध्यक्ष असावी. महिलांच्या प्रश्नांची संबंधित असलेल्या किंवा ज्यांना सामाजिक कार्याचा अनुभव व कायद्याचे ज्ञान आहे अशा कर्मचाऱ्यांमधून किमान दोन सदस्य तसेच अशासकीय संघटना किंवा लैंगिक छळाशी संबंधित प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्ती यामधील एक सदस्य असावा. समितीमध्ये किमान ५० टक्के सदस्य महिला राहतील व समितीचा कार्यकाल हा तीन वर्षांचा राहील. शासनस्तरावर अंतर्गत तक्रार समितीची माहिती ऑनलाईन अपडेट करण्याची कार्यवाही



सुरू आहे. त्यासाठी प्रत्येक कार्यालयाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केल्याची माहिती तात्काळ जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय अमरावती, महिला व बालविकास भवन, गर्ल्स हायस्कूल चौक, कॅम्प रोड, अमरावती (वुलवेरीरींरींळसारळश्र.लो) येथे सादर करणे आवश्यक आहे. ज्या कार्यालयामध्ये १० पेक्षा कमी कर्मचारी कार्यरत आहे त्यांनी स्थानिक तक्रार समिती अमरावती, जिल्हाधिकारी कार्यालय अमरावती यांच्याकडे आपली तक्रार नोंदवावी असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी डॉ. उमेश टेकाळे यांनी असे आवाहन केले आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. १७ डिसेंबर २०२४

शहर/ग्रामिण




## विधानभवन परिसरात 'लोकराज्य दुर्मिळ अंक' प्रदर्शनाचे उद्घाटन

# लोकराज्य दुर्मिळ अंकाचे डिजीटायजेशन व्हावे

## - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## मंत्री, आमदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन केले कौतुक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७नागपूर- :** लोकराज्य दुर्मिळ अंक हे माहितीचा अमुल्य ठेवा असून त्याचे जतन व संवर्धन होण्याकरिता या अंकांचे डिजीटायजेशन व्हावे, अशा सूचना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी आज विधानभवन परिसरात लावण्यात आलेल्या लोकराज्य दुर्मिळ अंक प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

नागपूर-अमरावती विभाग संचालक कार्यालयाच्या वतीने लावण्यात आलेल्या या प्रदर्शनास मंत्री, आमदार व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी भेट देऊन राज्याच्या गौरवशाली परंपरेच्या माहितीचा ठेवा असणाऱ्या या प्रदर्शनाचे कौतुक केले.

उद्घाटन प्रसंगी छत्रपती संभाजीनगर विभागाचे संचालक किशोर गांगुर्डे,नागपूर-अमरावती विभागाचे माहिती संचालक डॉ. गणेश मुळे, लोकराज्यचे संपादक तथा माहिती संचालक (वृत्त व जनसंपर्क) दयानंद कांबळे,वरिष्ठ पत्रकार धर्मेंद्र जोरे, नागपूर जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार, वर्धा जिल्हा माहिती अधिकारी रवि गिते, चंद्रपूर जिल्हा माहिती अधिकारी राजेश येसनकर आदी यावेळी उपस्थित होते.

महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी प्रदर्शनाची पाहणी केली. तसेच या दुर्मिळ अंकांचा ठेवा अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी डिजीटायझेशन आणि अन्य आधुनिक पद्धतीचा उपयोग करण्याच्या सूचना यावेळी दिल्या. दुर्मिळ अंकांच्या मांडणीचे कौतुकही त्यांनी केले.

**मान्यवरांच्या भेटी व सेल्फी स्टँडवर छायाचित्रे-** विधीमंडळ अधिवेशनाचा पहिलाच दिवस असल्याने विधानभवन परिसरात विधानसभा व विधानपरिषद सदस्यांची लगबग होती. वाटेतच लोकराज्य दुर्मिळ अंकांचे आकर्षक प्रदर्शन दिसताच



त्यांनी भेट दिली. यावेळी पाहणी करून आपल्या प्रतिक्रिया ही नोंदविल्या. याठिकाणी उभारण्यात आलेल्या सेल्फी स्टँडवर पोज देऊन छायाचित्रेही काढून घेतली. भेट देणाऱ्यांमध्ये मंत्री, ड. आशिष जायस्वाल, आमदार सर्वश्री प्रविण दरेकर, चित्रा वाघ, बाबुसिंग राठोड, अबु आझमी, श्रीजया चव्हाण, सुहास बाबर, देवराव भोंगळे यांचा समावेश आहे. गृह विभागाचे अपर मुख्य सचिव इक्बालसिंग चहल, वनविभागाचे उपसचिव विवेक होशिंग, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे अवर सचिव धिरज अभंग यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही प्रदर्शनास भेट दिली. अधिवेशन कालावधीमध्ये दररोज सकाळी ९ वाजता पासून ही पाहण्यास उपलब्ध राहणार आहे.

### प्रदर्शनात वैविध्यपूर्ण माहितीचा ठेवा असणारे दुर्मिळ अंक

१९६४ पासूनचे अंक येथे लावण्यात आले आहेत. संत ज्ञानेश्वर आणि कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या जन्मशताब्दी निमित्त प्रकाशित अंक, मराठी संगीत रंगभूमी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण, मराठवाडा विकास व सांस्कृतिक अंक, स्वातंत्र्यदिन विशेषांकासह महाराष्ट्र राज्यातील महान व्यक्तीमत्वे, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक असा वैविध्यपूर्ण ठेवा तसेच शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती असणारे १५० अंक याठिकाणी लावण्यात आले आहेत.

## लाडक्या बहिणींसाठी खुशखबर.....

# हिवाळी अधिवेशनात १४०० कोटींची तरतूद मंजूर



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ नागपूर -** हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ३५ हजार ७८८ कोटींच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या आहेत, त्यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ३५ हजार ७८८ कोटींच्या पुरवणी मागण्या मंजूर झाल्या आहेत, त्यामध्ये मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी १४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

लाडकी बहीण योजनेतील तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी अधिवेशनात पहिल्याच दिवशी तरतूद करण्यात आली आहे. महिलांना दिले जाणारा हफ्ता १५०० रुपयांवरुन २१०० रुपये करण्याची तरतूद अद्याप करण्यात आलेली नाही. त्यामुळे महिलांना २१०० रुपयांसाठी आणखी प्रतीक्षा करावी लागणार आहे.या तरतूदीसोबतच मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना ३०५० कोटी, सार्वजनिक बांधकाम विभागातील रस्ते व पूल बांधणी १५०० कोटी रुपये, मोदी आवास घरकुल योजनेसाठी १२५० कोटी, मुंबई मेट्रोसाठी अर्थ सहाय्य म्हणून १२१२ कोटी, आणि मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेसाठी ५१४ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेद्वारे महिलांना दर महा १५०० रुपये दिले जातात. राज्य सरकारनं जुलै ते नोव्हेंबरमहिन्यांपर्यंतचे पाच हप्त्यांचे १५०० रुपयांप्र माणं ७५०० रुपये दिले गेले आहेत. आता महिलांना डिसेंबर महिन्याचे १५०० रुपये कधी मिळणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. महायुतीनं विधान सभा निवडणुकीच्या प्रचारावेळी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचं आश्वासनं दिलं होतं.

# संत गाडगेबाबा ट्रॅव्हल्सच्या मालकाला प्रादेशिक परिवहन विभागाचे अभय

## अमरावती-मोर्शी महामार्गावर अशोक रेवस्कर यांची दादागिरी

## प्रवाश्यांसह अन्य प्रवासी वाहनांना मानसिक त्रास

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७अमरावती-** अमरावती, मोर्शी मार्गावरील प्रवासी वाहतूक करणाऱ्या संत गाडगेबाबा ट्रॅव्हल्सच्या मालकांकडून प्रवासी व अन्य प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनधारकांवर दादागिरी करण्याचा प्रकार नवीन नाही मात्र या प्रकाराला आता प्रादेशिक परिवहन विभाग अभय देत असल्याने संत गाडगेबाबा ट्रॅव्हल्स चे संचालक अशोक रेवस्कर व सुमित रेवस्कर यांच्या दादागिरी विरोधात मोर्शी परिसरातील ग्रामवासी तसेच आझाद समाज पार्टी व भीम आर्मीने दंड थोपटले असून प्रादेशिक परिवहन विभागाला निवेदन सादर करण्यात आले आहे. नियमबाह्य प्रवासी वाहतूक तसेच दादागिरी करणाऱ्या रेवस्कर यांच्या टोळीला आवर न घातल्यास आंदोलनाचा इशारा विभागाला देण्यात आला. संत गाडगेबाबा नावाने रेवस्कर यांच्या स्वतःच्या मालकीच्या चार ट्रॅव्हल्स (प्रवासी वाहने) आहेत तर अन्य आठ एकूण बारा प्रवासी वाहने या अनेक वर्षांपासून अमरावतीते मोर्शी या मार्गावर चालतात.मात्र अशोक रेवस्कर व सुमित रेवस्कर हे दोघेही स्वतःची चार वाहने भरल्याशिवाय इतर वाहनांचा नंबर असूनही प्रवासी वाहतूक करू देत नाही.इतर प्रवासी वाहनांमध्ये प्रवासी बसले तर रेवस्कर त्या प्रवास्यांना खाली उतरवून स्वतःच्या वाहनात बसवतो. कुणी याबाबत तक्रार केली तर अशोक रेवस्कर खोट्या तक्रारी करून गोरगरीब वाहनचालकांवर कार्यवाही करण्यासाठी पोलिसांवर दबाव आणतो. संत गाडगेबाबा वाहन क्र. एम एच २७,बी एक्स१५४३ व अन्य एक प्रवासी वाहन अमरावती पांढुर्णा स्टेज कॅरेज परवाना वाहन असून सदर वाहन सर्वच थांब्यावर थांबून अवैधरित्या प्रवासी वाहतूक करते. याबाबत अनेकवेळा प्रादेशिक परिवहन विभागाला तक्रारी करून सुद्धा विभागाने कोणत्याही प्रकारची दखल घेतली नाही.महिलांना अर्ध्या तिकिटात प्रवास आहे म्हणून वाहनात बसवितात आणि नंतर पूर्ण तिकीट घेतात तसेच पांढुर्णा जाणाऱ्या आदिवासी मजूर वर्गाला वाहनात बसवून मूळ थांब्यावर न उतरवीता त्यांना एक दोन किलोमीटर अलीकडे उतरवून आदिवासी प्रवास्यांना मानसिक




त्रास देण्याचे काम सुद्धा अशोक रेवस्कर व त्यांची टोळी करत आहे. अनेक गोरगरीब चालक मालकांनी कर्ज घेऊन छोटे मोठे वाहन घेतले मात्र या मार्गावर केवळ माझीच वाहने चालतील अशी दादागिरी करत अशोक रेवस्कर करत आहे.अशोक रेवस्कर यांचे प्रवासीवाहतूक करणारे वाहन नियमबाह्य असून याविरोधात दोन वर्षांपूर्वी उपोषण सुद्धा करण्यात आले होते मात्र प्रादेशिक परिवहन विभाग डोळे मिटून केवळ अशोक रेवस्कर यांच्या वाहनाला अभय देत आहे व इतर वाहनांवर अन्याय करत आहे.त्यामुळे मोर्शी परिसरातील त्रस्त नागरिकांनी तसेच आझाद समाज पार्टी, भीम आर्मीच्या वतीने अक्षय पांडे, गौरव छापाने, सामाजिक कार्यकर्ते राजू वानखडे, अक्षय पांडे, प्रवीण तायडे, हर्षवर्धन राऊत, सिद्धार्थ यावले, संकेत पांडे, सागर खंडारे, नितेश इंगळे, अनिकेत चोपडे, आशिष राऊत, निखिल बागडे यांचेसह शेकडो नागरिकांनी आपल्या स्वाक्षरीने निवेदन प्रादेशिक परिवहन विभागाला दिले असून संत गाडगेबाबा प्रवासी वाहनाचा परवाना रद्द करावा अशी मागणी केली आहे.

## महानगर पालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे

# पाणी तपासणीची विशेष मोहीम सुरू

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७अमरावती** -महानगर पालिका अंतर्गत येत असलेले सर्व हॉटेल , खानावळ , रक्त पेढी , पाणी कॅन , आइस फॅक्टरी , चहा चे दुकान, बार ,रेस्टॉरंट , धाबे व इतर ठिकाणच्या अस्थापना , दुकाने ज्या ठिकाणी साथ रोग पसरण्याची शक्यता असते त्या ठिकाणची सुष्मजिव पाणी तपासणी विशेष मोहीम मनपा आयुक्त सचिन कलंत्रे व सार्वजनिक आरोग्य विभागाचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ विशाल काळे यांच्या आदेशानुसार अमरावती शहराचे साथ रोग नियंत्रण अधिकारी डॉ रुपेश खडसे यांनी सुरू केली आहे शहरात ज्या ज्या आस्थापना यांना बाजार परवाना अंतर्गत येणाऱ्या सार्वजनिक ठिकाणी पाण्याचा वापर होत असेल त्या त्या ठिकाणचे पाणी हे दूषित नसले पाहिजे नागरिकांना शुध्द पाणी पिण्यास मिळाले पाहिजे व तिथे काम करणारे व्यक्ती, कामगार हे निरोगी असायला पाहिजे त्या साठी



नुकताच प्रशासक यांनी प्रशासकीय ठराव घेऊन आरोग्य विभागाने आरोग्य विषयक नाहरकत प्रमाणपत्र देण्यात यावे ह्या साठी सर्व हॉटेल , बार, खानावळ , रक्त पेढी , पाणी कॅन, चायनीज सेंटर, पंचकर्म व इतर आस्थापना यांची वापरण्यात येणाऱ्या पाणी ची तपासणी करण्यासाठी डॉ रुपेश खडसे साथ रोग नियंत्रण अधिकारी , हैदर अली स्वास्थ निरीक्षक ,बबन खंडारे आरोग्य बहुउद्देशीय कर्मचारी यांच्या माध्यमातून करण्यात आली हे पाणी नमुने सुष्म जीव परीक्षण साठी व पिण्यास योग्य आहे किंवा नाही त्या साठी जिल्हा प्रयोग शाळा येथे पाठवून व क्वालिटी बघण्यासाठी योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर त्या आस्थापना - पेढी यांना आरोग्य विषयक नाहरकत देण्यात येणार आहे तरी सर्व आस्थापना दुकाने यांनी सार्वजनिक आरोग्य विभाग महानगर पालिकेतून पाणी तपासणी करून घ्यावे व आरोग्य विभागातील साथ रोग कक्ष शी संपर्क साधावा अशी माहिती डॉ विशाल काळे आरोग्य अधिकारी यांनी दिली.

# आ.राणा म्हणतात मी अधिवेशनात फिरकणारच नाही...

## मंत्रिपद न मिळाल्याने कार्यकर्ते प्रचंड नाराज

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७अमरावती**

(पासपोर्ट)राज्य मंत्रिमंडळाचा विस्तार रविवारी (ता.१६) झाला. यावेळी भाजपाचे १९, शिवसेनेचे ११ आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. मंत्रिमंडळ विस्तारात जातीय आणि विभागीय समीकरण राखण्याचा प्रयत्न मुख्यमंत्र्यांनी केला आहे. पण, त्याचवेळी महायुतीमध्ये नाराजी नाट्यदेखील सुरु झालंय. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केलीय. त्याचबरोर अमरावती जिल्ह्यातले मुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय आमदार देखील मंत्रिपद न मिळाल्याने नाराज झाले आहेत.अमरावती जिल्ह्यातल्या बडनेरा मतदारसंघातील आमदार रवी राणा मंत्रिपद न मिळाल्यानं नाराज झाले आहेत. राणा हे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय समजले जातात. राणा यांच्या राष्ट्रीय युवा स्वाभिमान पक्षाची भाजपाशी युती आहे. ते बडनेरा मतदारसंघातून यंदा चौथ्यांदा आमदार म्हणून निवडून आले आहेत. राणा यांचे नाव यंदा संभाव्य मंत्री म्हणून आघाडीवर होते. पण, त्यांना यंदा



पुन्हा एकदा निराशा सहन करावी लागली. मंत्रिपदाची संधी हुकल्याने राणा नाराज झाले आहेत. ते रविवारी नागपूर सोडून अमरावतीमधील निवासस्थानी परतले आहेत. तसेच अधिवेशनाच्या पूर्ण कालावधीमध्ये नागपूरला जाणार नसल्याची माहिती राणा यांनी अनौपचारिक चर्चेच्या दरम्यान केली.मंत्रिपद न मिळाल्याने रवी राणा समर्थक आणि कार्यकर्ते नाराज झाले आहेत. राणा यांना मंत्रिपद मिळायला पाहिजे होते, ते न मिळाल्यानं अमरावती जिल्ह्याचा विकास खुंटणार आहे, अशी प्रतिक्रिया राणांच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली आहे. आज रवी राणा अमरावतीमधील निवासस्थानी असून ते दिवसभर कार्यकर्त्यांच्या भेटी घेणार आहेत.

# २२६५ पैकी १६ गावांची पशुगणना पूर्ण

## २९९ प्रगणक-पर्यवेक्षक करत आहे डिजिटल पद्धतीने डेटा संकलित

## २१२ गावांमध्ये प्रगणचे काम सुरू

विदर्भ प्रजासत्ताक

दि.१७अमरावती

अमरावती जिल्ह्यात २५ नोव्हेंबरपासून सुरू झालेल्या २१ पशुगणनेच्या प्रक्रियेत आतापर्यंत जिल्ह्यातील एकूण २०१८ गावे आणि २४७ नागरी वाड्यांमधील एकूण २२६५ क्षेत्रांपैकी १६ गावांमध्ये पशुगणनेची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. सध्या २१२ गावांमध्ये जनगणनेचे काम सुरू आहे. पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. शिवेंद्र महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पशुगणनेसाठी ग्रामीण भागात १८० प्रगणक व ४८ निरीक्षक व शहरी भागात ५५ प्रगणक व १६ निरीक्षक असे एकूण २९९ प्रगणक-पर्यवेक्षक प्रत्येक जनावरांची आकडेवारी संकलित करत आहेत. जिल्ह्यात डिजिटल स्वरूपातील ही पशुगणना २८ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करायची आहे. अशी माहिती जिल्हा पशुधन विकास अधिकारी डॉ. आनंद भरतिया यांनी दिली. मोजणीसाठी खास ॲप विकसित करण्यात आले आहे. याद्वारे गणना अधिकारी घरोघरी जाऊन गाय, म्हैस, मेंढी, शेळी, डुक्कर अशा १६ प्रजातींच्या प्राण्यांची माहिती गोळा करत आहेत. हे ॲप जीपीएस प्रणालीशी जोडलेले आहे. याच्या मदतीने नेटवर्क नसले तरी नेटवर्क झोनमध्ये गेल्यावर डेटा सेंट्रल सर्व्हरशी जोडला जाऊ शकतो. या ॲपद्वारे प्राण्यांची माहिती आणि त्यांच्या मालकाची ओळखही कळते.

### ２५ प्रश्नांची यादी, प्राध्यापकांद्वारे प्राण्यांची माहिती

२५ प्रश्नांची यादी तयार करण्यात आली आहे. ज्यामध्ये पशुपालकांच्या प्राथमिक माहितीशिवाय त्यांच्या शेतीची मालमत्ता, उत्पन्नाचे स्रोत, जातीनिहाय माहिती आणि त्यांचे पशुधन यांची माहिती संकलित केली जात आहे. यामध्ये कोणत्या गावात किती जनावरे आहेत, किती गावे जनावरे नसलेली आहेत, कोणत्या गावात प्राण्यांच्या सर्वात जास्त प्रजाती आहेत. तुम्हाला अद्ययावत तपशील इत्यादी मिळतील.



**भटक्या विमुक्तांच्या पशुधनाची प्रथमच स्वतंत्र मोजणी**

इतर जिल्ह्यांतून व राज्यांतून जिल्ह्यात येणाऱ्या भटक्या जातीतील उंट, घोडे, टट्टू, खेचर, गाढवे, हत्ती अशा पशुधनाची प्रथमच स्वतंत्र मोजणी केली जात आहे. त्यामुळे जिल्हा पशुधन विभागाला भटक्यांची स्वतंत्र आकडेवारीही मिळणार आहे. त्यामुळे भटक्या प्राण्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी होण्यास मदत होणार आहे.

# संत अच्युताय नमःचा जप करण्यातच आमचं भाग्य-जितेंद्रनाथ महाराज

## शेंदूरजना बाजार येथील संत अच्युत महाराज जन्मशताब्दी उत्सवाचा थाटात समारोप, सेवेकऱ्यांचा सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७तिवसा**– तुमच्या-आमच्यासाठी सद्गुरु माऊली कधी काम करणार नाही,असे होऊ शकत नाही. आजपासून ज्योतिष वगैरे बंद करा,जे काही होईल ते सद्गुरु चरणी विलीन करावं आणि अच्युताय नमः चा जप करावा,यातच आमचं भाग्य असल्याचे विचार आचार्य जितेंद्रनाथ महाराज यांनी मांडले.ते दत्तजयंती निमित्त गुरुग्राम श्री क्षेत्र शेंदूरजना बाजार येथे आयोजित करण्यात आलेल्या श्री संत अच्युत महाराज यांच्या जन्मशताब्दी उत्सवाच्या समारोपाप्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जगद्गुरु रामराजेश्वर माऊली सरकार,संत सयाजी महाराज,संत सचिन देव महाराज,जनार्दनपंत बोथे गुरुजी,हभप कनेरकर महाराज, डॉ अनिल सावरकर,डॉ अरुण पावडे,अभिजित बोके,नितीन गभने,बापूसाहेब देशमुख, कृष्णा गिरीधर,नामदेव अमालकर,चौबे महाराज,माजी खासदार डॉ अनिल बोंडे,माजी आमदार यशोमती ठाकूर,मनोज वाडेकर, अनंत धर्माळे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना जितेंद्रनाथ महाराज यांनी सांगितले की,आज एवढ्या मोठ्या संख्येने संत अच्युत महाराजांच्या जन्मशताब्दीला आपण येथे जमलोय, येथे शेंदूरजना ची जागा पुरली नाही,उद्या महाराजांच्या समाधी सोहळ्याचा जेव्हा महोत्सव होईल तेव्हा तिवसा पर्यंतचीही जागा पुरणार नाही,एवढी भक्तांची संख्या राहील,असे संकेत दिले.त्याचबरोबर सचिन देव महाराज संतरत्न म्हणजे अच्युत महाराज असल्याचे सांगून महाराजांच्या प्रत्येक कामात ब्रम्ह आहे.आज महाराजांच्या जन्मशताब्दी उत्सवाचा समारोप काल्याने



होत असून दिल्ली पासून अमरावती च्या गल्लीपर्यत भक्तगण येथे एकत्रित होणे हाच खरा काला असल्याचे सांगितले.तर रामराजेश्वर माऊली सरकार यांनी याप्रसंगी बोलताना सांगितले की,कुणीतरी म्हणून गेले बटेंगे तो कटेंगे याचा अर्थ असा आहे,आपण परिवारातून बटलो आहे आणि संस्काराने कटलो आहे पण श्री संत अच्युत महाराजांचा हा परिवार कधी बटला नाही आणि संस्काराने देखील कटला नाही,याची प्रचिती आज या जन्मशताब्दी सोहळ्यात दिसून येत असल्याचे सांगितले. कार्यक्रमात भव्य दिव्य सोहळ्यामध्ये ८ दिवस सतत परिश्रम घेऊन सेवा देणाऱ्या अनेक सेवेकऱ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे महाराजांच्या सेवेत असलेल्या शतायुषी १०४ वर्षीय जेष्ठ सेवेकरी श्रीमती प्रभाताई सितारामजी हेडा व १०१ वर्षीय श्रीमती नर्मदाबाई गुलाबराव सावरकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला.काल्याचे कीर्तन नारायण शिंदे महाराज व त्यांच्या संच ने केली.कार्यक्रमाचे संचालन डॉ साजिद शहा व डॉ अनिल निमकर यांनी केले.कार्यक्रमा करीता शेंदुरजना बाजार मधिल सर्व सार्वजनिक मंडळे व महीला मंडळे आणि गावातील सर्व महीला व पुरुष मंडळी यांनी तसेच श्री.संत अच्युत महाराज संस्थान श्री क्षेत्र शेंदुरजना बाजारचे अध्यक्ष डॉ.अनिल सावरकर,सचिव मनोहर निमकर,कोषाध्यक्ष सतिश सावरकर,सहसचिव नारायण बोडखे,विश्वस्त ॲड.विवेक सावरकर,ॲड.सचिन देव,राजेन्द्र देवळे,भाष्कर बोडखे,राजेन्द्र सावरकर,प्रमोद निमकर,जनदिश काळे,पवन भोजने,सचिन चाफले यांचे सहकार्य लाभले.

## शहरात कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती**शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस आयुक्त (अमरावती शहर) यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

सदर प्रतिबंधात्मक आदेश शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला असून दि. १८ डिसेंबर ते १ जानेवारी २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे पोलीस आयुक्त (अमरावती शहर) नविनचंद्र रेड्डी यांनी कळविले आहे.

## १४ राज्यात थंडीच्या लाटेचा इशारा१९ डिसेंबर पर्यंत अलर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७अमरावती** – भोपाळ आणि जबलपूरसह ३७ जिल्ह्यांमध्ये थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. उत्तर प्रदेशातील अयोध्येत पारा २.५ अंशांवर पोहोचला आहे. १३ वर्षांनंतर कानपूरमध्ये किमान तापमान ४.५ अंश नोंदवले गेले. तर राजस्थानमध्ये पुढील चार दिवस कडाक्याची थंडी पडण्याची शक्यता आहे.

थंडीच्या लाटेचा ऑरेंज अलर्टजारी हवामान विभागाने जारी केला आहे. हवामान खात्याने सोमवारी बिहार-हरियाणासह १४ राज्यांत थंडीच्या लाटेचा इशारा जारी केला आहे. पंजाब आणि मध्य प्रदेशात थंडीच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहेताज्या हिमवृष्टीनंतर उत्तराखंडमधील पिथौरागढ जिल्ह्यातील १८ हजार फूट उंच 'ओम' पर्वत बर्फाने झाकला गेला आहे. आता आदि कैलास, बद्रीनाथ, केदारनाथ आणि गंगोत्री धामसह उंच भागात एक फुटापर्यंत बर्फवृष्टी झाली आहे. राज्य हवामान केंद्राचे संचालक



डॉ. बिक्रम सिह यांनी दिलेल्या माहितीनुसार, आठवडाभरानंतरबर्फवृष्टीची दुसरी जोरदार फेरी अपेक्षितआहे. कडाक्याच्या थंडीमुळे संपूर्ण मध्यप्रदेश गारठला आहे. रविवारी सलगसातव्या दिवशी राज्यात थंडीची लाटकायम राहिली. पुढील ४८ तास म्हणजेआणखी २ दिवस अशीच थंडी कायमराहील. सोमवारी भोपाळ आणिजबलपूरसह ३७ जिल्ह्यांमध्ये थंडीचीलाट येण्याचा इशारा देण्यात आलाआहे. यापैकी ९ जिल्हे असे आहेत कीजेथे झाडे आणि वनस्पतींच्या पानांवरबर्फ साचू शकतो. राजस्थानमध्येथंडीचा प्रभाव तीव्र होणार आहे. पुढीलचार दिवस राज्यातील शहरांमध्येकडाक्याची थंडी राहणार आहे.

## जिल्ह्यात एसटी बसचा तुटवडा, प्रवाशांची गैरसोय

### ४६५ बसचा भार ३२६ बसेसवर

विदर्भ प्रजासत्ताकदि.१७अमरावतीएकीकडे एसटीच्या ताफ्यात नव्या इलेक्ट्रिक गाड्या दाखल होत आहेत; पण सर्वसामान्य प्रवाशांची निकड लक्षात घेता सन २०१९ मध्ये ४६५ बसगाड्या होत्या. त्या तुलनेत अमरावती विभागाला १४५ गाड्यांची कमतरता असल्याने एसटी प्रशासनाला नियोजन करताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. दुसरीकडे कमी एसटी बसमुळे मात्र प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

अमरावती विभागात राज्य परिवहन महामंडळाचे अमरावती, बडनेरा, परतवाडा,



दर्यापूर, चांदूर बाजार, मोर्शी, वरूड आणि चांदूर रेल्वे, असे आठ एसटी आगार आहेत. या आगारांमध्ये सन २०१९ मध्ये ४६५ एसटी बसगाड्या होत्या. एप्रिल २०२३ मध्ये बसची संख्या ३६५ वर आली.

यामधील तब्बल १०० गाड्यांचेआयुर्मान संपल्याने टप्पाटप्प्यात स्क्रॅप करण्यात आल्या. अशातच एप्रिल २०२४ मध्ये या एसटी बसची संख्या ३२६ वर आली आहे. येत्या मार्च महिन्यापर्यंत एसटी महामंडळाच्या ३२६ बस गाड्यांपैकी ४५ गाड्यांचे

**खड्ड्यामुळे गाड्या नादुरूस्तीचे प्रमाण वाढले**

एसटी बसमध्ये इंजीन बिघाड, इलेक्ट्रिकल नादुरुस्त, ट्रान्समिशन फेल, एक्सेल तुटणे, सस्पेन्शन आदी समस्या उद्भवत आहेत. याशिवाय खराब रस्ते, वाहतूक कोंडी यामुळे गाड्यांना नियोजित वेळेत पोहोचता येत नाही. खड्यांमुळे एसटी बसेसमध्ये बिघाडाचे प्रमाणही वाढले आहे.

आयुर्मान संपल्याने टप्प्याटप्प्याने स्क्रैप करण्यात येणार आहेत. त्यामुळे तीन वर्षांपूर्वी अमरावती विभागात एसटीच्या ताफ्यात सुमारे ४६५ एसटी बस होत्या. ती संख्या मार्च महिन्यापर्यंत तरी यापैकी २८१ वर येणार आहे. अशातच मागील काही दिवसांपासून बसमध्ये बिघाडाचे प्रमाण वाढले आहे.

शासनाने एसटी बसमध्ये महिलांना अर्ध्या तिकिटात प्रवास, ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास यासह अन्य अनेक प्रवासी सवलत योजना एसटी महामंडळाकडून राबविल्या जात आहेत. परिणामी, एसटी बसकडे प्रवाशांचा ओढाही वाढला आहे. विशेष म्हणजे, एसटी बसचा तुटवडा असल्याने पैसे देऊन रस्त्यावर ताटकळण्याची वेळ प्रवाशांवर येत आहे. एसटी गाड्यांची तोकडी संख्या हे महत्त्वाचे कारण आहे.प्रवाशांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. अशातच अमरावती विभागाला नव्या गाड्या कधी मिळणार, याची प्रतीक्षा आहे.

## शेकोटीमुळे जनावरांच्या गोठ्याला आगधान्याची राखरांगोळी, तीन बैल जखमी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७धारणी**– धारणी तालुक्यातील डाबका गावातील श्यामलाल कास्देकरच्या शेतातील पाळीव प्राण्यांच्या गोठ्याला रविवारी आग लागल्याने ज्वारी, गहुसह जनावारांचा चारा जळून खाक झाला. तर या भीषण अग्नि तांडवात तीन बैल पण अंशिक जवळून जखमी झाल्यानेगरीब आदिवासी शेतकरी संकटात सापडलेला आहे. धारणी भागात सध्या शीत लहन वाहत असून पारा ०७ अंश सेल्सीअस पर्यंत घसरलेला असताना डाबका गावात सकाळी अकराचे दरम्यानशेकोटीमुळेजनवारांच्या गोळ्याला आग लागलेली होती. १५ डिसेंबर रोजी घडलेल्या या घटनेत ज्वारी, गहु आणि चारा सुध्दा जळून गेला.सध्या जखमी बैलांवर उपचार सुरू आहे.

झाला. गोठ्यात बांधलेले तीन बैलांना पण आगीमुळे जखमी झाले. सुदैवाने श्यामलाल व ग्रामस्थांनी बैलांना आगीतून बाहेर काढले. थोडा उशिर झाला असता तर आगीत बैल सुध्दा जळून दगावले असते. घटनेची माहिती मिळताच तलाठी राकेश पटोरकरने घटनास्थळी पोहचून पंचनामा करून तहसिलदार प्रदीप शेवाळे यांच्याकडे अहवाल पाठविलेला आहे. रविवारी झालेल्या घटनेमुळे श्यामलाल कास्देकरचे कुटुंब आर्थिक अडचणीत आलेले असल्याने शासनाने त्यांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता आहे.मेळघाटात थंडीची लाट – असताना आग लागल्याची घटना झाल्याने एकच आश्चर्य – व्यक्त होत आहे. मात्र, जनावरांचा गोठा हा लाकुड व – बांबुचा असल्याने आगीच्या भक्ष्यस्थानी सापडल्याचे समजते.–

## मी नवीन जबाबदारीची वाट पाहात आहे – सुधीर मुनगंटीवार

### फडणवीस, बावनकुळेंशी सतत बोलणं व्हायचं, पण त्यांनी हे जाणवू दिलं नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१७ वर्धा /चंद्रपूर** :– राज्य मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर सत्तेतल्या तिन्ही पक्षांमध्ये नाराजी असल्याचं दिसून येत आहे. अनेक मंत्र्यांना डावललं गेलं आहे तर काही इच्छुकांना मंत्रिमंडळातून दूर ठेवण्यात आलेलं आहे. मागच्या महायुती सरकारमध्ये मंत्री असलेले सुधीर मुनगंटीवार यांना यावेळी भाजपने संधी दिलीली नाही. माध्यमांशी बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, मी नाराज कधीच असू शकत नाही. आज विधानसभेत कामकाज नव्हतं, त्यामुळे गेलेलो नव्हतो. कारण नसताना अनेकजण अनेक प्रश्न विचारतील त्यामुळे गेलो नाही. मागच्या वेळी खाती देताना सांस्कृतिक वगैरे खाती दिली. त्यातही मी जीव लावून काम केलं. आताही जीव लावून काम करणार आणि संघटनेसोबत राहणार. मुनगंटीवार पुढे म्हणाले की, मला मंत्रिपद देणार, असं सांगितलं होतं. त्यानंतर मला मंत्रिपद देणार नाही, असं सांगितलं नाही. मी नवीन जबाबदारीची वाट पाहात आहे. देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी माझं सातत्याने बोलणे व्हायचे. मात्र त्यांनी कधी हे जाणवू दिले नाही. दोन्ही नेत्यांनी मला, नाव पुढे पाठवले आहे, असंच सांगितलं होतं. परंतु माझे नाव नव्हते. त्यावर मी रात्रीपासून विचार करतोय. नेमके



काय झाले, हे मला अद्याप कळलेले नाही. मंत्री असतो तर मी आज सभागृहात आलो असतो. परंतु आज काही माझे काम नव्हते, त्यामुळे मी सभागृहात आलेलो नव्हतो. जेव्हा मला प्रश्न मांडायचे आहेत, तेव्हा मी नक्कीच जाणार आहे. लोकसभेला उभे राहिलो नंतर विधानसभेत मोठा विजय झाला. तरीही मला का डावललं, हे मला माहिती नाही. मी संघटनेवर विश्वास ठेवणारा माणूस आहे, खचून जाणारा कार्यकर्ता नाही. मुनगंटीवार म्हणाले की, प्रमोद महाजन म्हणायचे, पावलापावलावर मनाविरुद्ध घडत असतानाही जो काम करतो, तो खरा कार्यकर्ता.. या विचारांवर काम करणारा मी कार्यकर्ता आहे. पक्षश्रेष्ठींच्या मनामध्ये काहीतरी दुसरी जबाबदारी असेल, त्यामुळे मला डावललं असेल. त्या जबाबदारीची मी वाट पाहतोय.

## कार चोरणाऱ्या टोळीतील तिघांना अटक

### राज्यभरात टाटा कंपनीच्या कारवर निशाना

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१७ अमरावती**– एलसीबीच्या पथकाने राज्यातील विविध जिल्ह्यामध्ये केवळ टाटा कंपनीच्या इंडिका, व्हिस्टा, इंडीगो कार करणाऱ्या कुख्यात टोळीतील तिघांना अटक केली. आरोपींनी यवतमाळ जिल्ह्यासह अमरावती शहर व ग्रामीण भागात ६ कार चोरीची कबूली दिली. त्यानुसार पोलिसांनी तिन्ही आरोपींच्या ताब्यातून चोरी गेलेली कार, सुट्टेभाग, मोबाइलसह ३ लाख ३६ हजाराचा ऐवज जप्त केला आहे.

प्रफुल्ल उर्फ बबलू गजानन गांगेकर (३५) रा.भारत नगरी, यवतमाळ, सैफुद्दीन इजाजुद्दीन खान (२८) रा. आझाद नगर, नवि वस्ती, टेका नाका, नागपुर, मो. एहतेशाम उर्फ अत्तु मो. इरफान (३२), रा. मोमीनपुरा, नागपुर अशीअटकेतील आरोपींचे नाव आहे. माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी अज्ञात चोरट्यांनी तळेगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील घुईखेड येथे राहणाऱ्या सचिन किसनराव वरघट (३४) यांची घरासमोर पार्क केलेली एमएच-४०-के आर- ९७५० क्रमांकाची इंडीगो कार चोरली होती. तसेच ग्रामीण भागातकार चोरीच्या दोन, तीन घटना घडल्याने एलसीबीचे प्रमुख पीआय किरण वानखडे यांनी त्यांच्या पथकातील पीएसआय मोहम्मद तस्लीम, पीएसआय नितिन इंगोले, मुलचंद भांरकर, कॉस्टेबल अमोल देशमुख, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, सुनिल महात्मे, निलेश डांगोरे, सायबरचे कॉस्टेबल सागर धापड, रितेश वानखडे, चेतन गुल्हाने, गुणवंत शिरसाठ, संजय प्रधान, हर्षद घुसे यांच्यासह तांत्रिक व गोपनीय पध्दतीने तपास सुरू केला. दरम्यान पोलिसांना कुख्यात कार चोर प्रफुल्ल उर्फ बबलू गांगेकरची लिंक मिळाली. प्रफुल्ल हा मुळचा वर्धा जिल्ह्यातील देवळी येथील रहिवासी आहे. परंतु, तो काही महिन्यापासून यवतमाळ शहरातील भारत नगरमध्येभाड्याने राहत असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी प्रफुल्लचा मोबाइल क्रमांक मिळवून ट्रेस केला असता तो पुलगावला असल्याचे कळताच पोलिसांनी त्याला आज १६ डिसेंबर रोजी पुलगाव येथून अटक केली. अटक होताच प्रफुल्लने तळेगाव, लोणी, अमरावती शहरातील बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन व यवतमाळ येथील अवधुतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील दोन अशा एकूण सहा कार चोरी केल्याची कबूलीदिली. प्रफुल्लहा चोरी केलेल्या कार नागपुर येथील टेका नाका परिसरात राहणाऱ्या सैफुद्दीन खानला विकतो आणि सैफुद्दीन खान कारचे सुट्टे भाग करून नागपुरयेथीलच भंगार व्यापारी मो. एहत्तेशाम उर्फ अत्तु मो. ईरफानला विकतो. त्यानुसार पोलिसांनी नागपुरातून सैफुद्दीन खान व मो. एहत्तेशाम या दोघांना अटक केली. पोलिसांनी प्रफुल्च्या ताब्यातून घुईखेड येथील सचिन किसनराव वरघट यांची एमएच-४०-के आर-९७५० क्रमांकाची इंडीगो कार, गाडी चोरीसाठी वापरलेले ५० हजाराचे साहित्य, वेगवेगळ्या कंपनीचे दोन मोबाइल व कारचे सुट्टे पार्ट असा एकूण ३ लाख ३६ हजाराचा ऐवज जप्त केला. तिन्ही आरोपींना पुढील कारवाईसाठी तळेगावदशासर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून तळेगाव पोलिस पुढील तपास करित आहे. आरोपींकडून राज्यातील कार चोरीचे अनेक गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तविली आहे.

# गाविलगड शौर्यदिन, मातृवंदना व मेळघाट परिषद

## भारत गणेशपुरे व रंजना मामर्डे सन्मानित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

स्वराज्य सेवा प्रतिष्ठान द्वारा चिखलदरा येथे गाविलगड शौर्यदिन, मातृवंदना आणि मेळघाट परिषदेचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रसिद्ध अभिनेते भारत गणेशपुरे यांना वऱ्हाड भूषण तर विदर्भ आंदोलन समितीच्या अध्वर्यू रंजना मामर्डे यांना विदर्भ वीरांगना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. किल्ले गाविलगड येथे झालेल्या या सोहळ्यातील शौर्य दिन व मातृवंदना कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. पृथ्वीराजसिंह राजपूत यांचेसह किल्लेदार राजा भैय्या ठाकूर, प्रदीपसिंह ठाकुर, प्रमुख वक्ते किशोर वानखडे, प्राचार्य शक्तीसिंह राजपूत, चिखलदरा नगर परिषदेचे माजी अध्यक्ष राजेंद्रसिंह सोमवंशी, संभाजीनगर येथील उद्योजक अशोक व नलिनी चिनागी, राजेंद्र गोरले, समाजसेवक चंद्रकांत पाटील उपस्थित होते. रंजनामामर्डे यांच्या हस्ते करण्यात आले.



या प्रसंगी समाजाच्या विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्या सेवावृत्तींचा स्वराज्य सेवा प्रतिष्ठान द्वारे सेवा सन्मान पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. या मध्ये सुप्रसिद्ध नुरोलोजीस्ट डॉक्टर सिकंदर अडवाणी, बँक ऑफ महाराष्ट्र चे ग्रामीण क्षेत्राचे चेअरमन मिलिंद घारड, महात्मा गांधी संशोधन केंद्र संशोधन केंद्र वर्धा येथील संचालक दीपकुमार वर्मा, डोमटेक आर्ट प्रायव्हेट लिमिटेड पुण्याचे संचालक सुनील काळे, मोर्शी येथील उत्कृष्ट शेतकरी गजानन बारबुद्धे, जैतादेही जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक जितेंद्र राठी, साई कोचिंग क्लासेसचे संचालक दिलीप हटवार, माहेर फाउंडेशनच्या संचालिका दीपा तायडे, प्रशांत गोरडे, ग्रामोद्धार सेवाव्रती दिलीप ठाकरे, राजर्षी शाहू महाराज वाचनालयाचे संचालक राहुल घडांगे, संत गाडगेबाबा अमरावती इतिहास मंडळ अध्यक्ष प्रा. डॉ. संतोष बनसोड, सिने दिग्दर्शक अनुराग दळवी हर्षदा स्कूल ऑफफ क्लासिकल डान्सच्या संचालिका सौ. हर्षदा पनके, चर्मकार महासंघाचे अध्यक्ष निलेश जामठे, पत्रकार किशोर मेटे, शांतनू डाहे (पोलवॉल्ट) आणि निषाद शेख (लॉन टेनिस) यांना सेवा सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.

जाणीव फाउंडेशन धामणगाव गढी आणि सनातन संस्था चिखलदरा या संस्थेस उत्कृष्ट पर्यावरण पुरस्काराने गौरविण्यात आले. सायंकाळच्या सत्रात संस्कृतिक कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या नालीनी चीनगी यांनी आई भवानीच्याचरणी गोंधळ नृत्य सादर करीत बहारदार सुरुवात केली. यानंतर विदर्भाच्या स्वरसम्राज्ञी श्रीमती रंजनाताई मामर्डे, विक्रम मामर्डे, म्युझिक फॅन्स क्लब परतवाड्याचे संचालक राजा ठाकूर, भारती ठाकूर, गजानन रोडगे, सुनील बहुरिया, डॉ. एकनाथ तट्टे, नीता तट्टे, विनोद तट्टे, रोमहर्ष बुजरूक, धनश्री बनसोड, किरण बनसोड, मास्टर ओम कराळे, मास्टर ऋतुराज, यांच्या बहारदार संगीत मैफिलिने चिखलदऱ्याच्या गुलाबी थंडीत रंगत भरली. शौर्य दिनाच्या यशस्वीतेसाठी स्वराज्य सेवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष शिवा काळे, राकेश महल्ले, सचिव प्रतीक पाथरे, कोषाध्यक्ष प्रफुल्ल रुईकर आणि महाराष्ट्र ाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या मावळ्यांनी परिश्रम घेतले.

मर्दानी खेळाने सुरुवात कार्यक्रमाची सुरुवात मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक व वस्तापुरच्या कोरकु बांधवांचे लोक नृत्य गदली सुसून द्वारे झाली. सातपुड्याच्या कुशीतील मेळघाटच्या परिपूर्ण परिसंस्थेशी निगडित पर्यावरण, वनसंपदा, प्राणी विश्व, आदीम संस्कृती, बोलीभाषा , शेती, इतिहास इत्यादी विषयांवर मेळघाट परिषदचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत प्रसिद्ध साहित्यिक अशोक मानकर, प्रा. डॉ. संतोष बनसोड, प्रा. डॉ.गोविंद तिरमनवार, डॉ. किशोर वानखेडे, प्राचार्य डॉ. एकनाथ तट्टे, सतीश झामरे या तज्ज्ञांचे विविध विषयावर मार्गदर्शन लाभले.

**२५० मावळ्यांनी केली चढाई**

१४ डिसेंबर रोजी गाविलगड पायथ्याशी असलेल्या बागलिंगा चौकी येथून प्राचार्य राजाभाऊ महाजन, यशवंत काळे, पंकज वैद्य, राजा धर्माधिकारी विशाखा खडके, अंजली जवांजाळ, अपूर्वा सोनार, जयकुमार चर्जन, ईशान जेठाणी, गणेशराव हिंगनिकर, कैलास पेंढारकर, रवींद्र मालठाने, दिनेश चोरे व राजेंद्रजी गोरले यांच्या उपस्थितीत २५० मावळ्यांनी गडचढाई मोहिम सुरू केली. त्यानंतर गडस्वच्छता, ऐतिहासिक वास्तूंची साफई आणि इतिहास तज्ज्ञ विवेक चांदुरकर, प्रतीक पाथरे, संघर्ष सावरकर यांच्याद्वारे इतिहास जागर करण्यात आला. किल्ल्याच्या दिल्ली दरवाजा येथे सिने अभिनेते भारत गणेशपुरे यांना वऱ्हाड भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.

# नागपूर ते अमरावती दरम्यान धावणाऱ्या ९ रेल्वेगाड्या रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७अमरावती**



मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात नागपूर ते वर्धा दरम्यान सिंदी रेल्वे स्थानकावर तांत्रिक काम करण्यात येत आहे. त्यामुळे नागपूर ते अमरावती दरम्यान धावणाऱ्या ९ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. उद्या १८ डिसेंबरला सात रेल्वेगाड्या धावणार नाहीत. काही रेल्वेगाड्यांचे थांबे बदलविण्यात आले आहेत, तर काही रेल्वेगाड्या उशिरा धावणार आहेत.

१८ डिसेंबर रोजी वर्धा-नागपूर मेमू (०१३७३), नागपूर-वर्धा मेमू (०१३७४), अमरावती-वर्धा मेमू (०१३७१) / वर्धा-अमरावती मेमू (०१३७२), भुसावळ-वर्धा एक्स्प्रेस (११११२१)/ वर्धा-भुसावळ एक्स्प्रेस (१११२२), अमरावती- अजनी एक्स्प्रेस (१२११९)/ अजनी अमरावती एक्स्प्रेस (१२१२०) तर अमरावती-जबलपूर एक्स्प्रेस (१३१५९) या रेल्वे रद्द करण्यात आल्या आहेत.

नागपूर-वर्धा मार्गावर धावणाऱ्या काही गाड्या रद्द करण्यात आल्या असून काही गाड्या परावर्तित मार्गाने जाणार आहेत. काही गाड्यांचे थांबे बदलविण्यात आले आहेत. लांब अंतराच्या अनेक गाड्या उशिरा धावणार आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होण्याची शक्यता आहे.

**महाराष्ट्र एक्स्प्रेस वर्धा स्थानकावरून**

गाडी क्रमांक ११०३९ कोल्हापूर गोंदिया महाराष्ट्र एक्स्प्रेस १७ डिसेंबर रोजी वर्धा रेल्वे स्थानकावर थांबेल. त्याचप्रमाणे गाडी क्रमांक ११०४० गोंदिया कोल्हापूर एक्स्प्रेस १८ डिसेंबरला गोंदिया रेल्वे स्थानकावरून सुटण्याऐवजी वर्धा रेल्वे स्थानकावरून दुपारी ११:५९ वाजता सुटेल.

**उशिरा धावणाऱ्या गाड्या**


गाडी क्रमांक ०५२९३ मुजफ्फरपूर सिकंदराबाद एक्स्प्रेस १७ डिसेंबरला आपल्या निर्धारित वेळेत सुटण्याऐवजी १ तास ३५ मिनिटे उशिरा धावेल. १२६२१ चेन्नई नवी दिल्ली एक्स्प्रेस याच दिवशी १.३० तास उशिरा, तर २०८०५ विशाखापट्टनम नवी दिल्ली एक्स्प्रेस तिच्या निर्धारित वेळेपेक्षा १.१५ तास विलंबाने धावेल. १२६२२ नवी दिल्ली चेन्नई एक्स्प्रेस १७ डिसेंबरला १.१० तास विलंबाने, तर १२६९१ बंगळुरू हजरत निजामुद्दीन एक्स्प्रेस ४५ मिनिटे उशिरा धावेल. १२८१० हावडा छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस एक्स्प्रेस निर्धारित वेळेपेक्षा ३० मिनिटे, १२७२३ हैदराबाद न्यू दिल्ली एक्स्प्रेस ३० मिनिटे, १८०३० कोलकाता शालीमार एलटीटी एक्स्प्रेस १५ मिनिटे, २२९०६ कोलकाता शालीमार ओखा एक्स्प्रेस १० मिनिटे, १२९७० जयपूर कोईम्बतूर एक्स्प्रेस १० मिनिटे, १२८४३ पूरी अहमदाबाद एक्स्प्रेस १० मिनिटे, २२६७० पाटना एर्नाकुलम एक्स्प्रेस १० मिनिटे, १२५१२ कोचुवेली गोरखपूर एक्स्प्रेस ही गाडी १० मिनिटे, तर ०११३९ नागपूर मडगाव एक्स्प्रेस (१८ डिसेंबरला) १० मिनिटे उशिरा धावेल.

# अतिक्रमण विभाग अंतर्गत अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

मा.आयुक्त व मा.उपायुक्त प्रशासन यांच्या आदेशाने सोमवार दिनांक १६/१२/२०२४ रोजी अतिक्रमण पथक प्रमुख योगेश कोल्हे निरीक्षक अन्सार अहमद यांच्या मार्गदर्शनाखाली जुना तहसील परिसर, बापट चौक, जवाहर गेट रोड, साबन पुरा, जुना मोटर स्टँड, गांधी चौक, चौधरी चौक, सरकारी पशुशल्य दवाखाना लगत लोखंडी खोके येथे साहित्य जप्तीची कारवाई करण्यात आली ४ ट्रक साहित्य जप्तीची अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. सदर ठिकाणी रोडच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण निर्मूलनाची कार्यवाही करण्यात आली. तसेच अतिक्रमणधारकांना सूचना देण्यात आल्या वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास दैनंदिन कारवाई सुरू राहणार सदर कार्यवाहीत अतिक्रमण विभागाचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.





# महायुतीचे आमदार गुरुवारी 'आरएसएस' स्थळी भेट देणार, अजित पवारांच्या भूमिकेकडे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**



हिवाळी अधिवेशना दरम्यान राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडून दरवर्षी भाजपच्या आमदारांसाठी संघपरिचय वर्गाचे आयोजन केले जाते. यावेळी भाजप आणि त्यांच्या मित्र पक्षाचे सर्व आमदार हे रेशीमबागेतील स्मृति मंदिर स्थळी जाऊन पहिले सरसंघचालक डॉ. हेडगेवार आणि गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृती स्थळाचे दर्शन घेतात. राज्यात शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस हे दोन्ही पक्ष फुटल्यावर महायुतीचे सरकार स्थापन झाले होते. त्यानंतर २०२३ मध्ये नागपुरात झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान संघाकडून परिचय वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांच्या आमदारांनी संघ दरबारी जाणे टाळले होते. यावर्षी संघाने १९ डिसेंबरला सकाळी आठ वाजता महायुतीच्या सर्व आमदारांना निमंत्रण दिले आहे. त्यामुळे अजित पवार यावेळी रेशीम बागला जाणार का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

याआधीही नागपुरात जाऊनही अजितदादांनी दोनदा भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या कार्यालयात जाणं टाळले होते. पण आता ते महायुतीत चांगलेच रुळले आहेत. तसेच त्यांचे ४१ आमदार निवडून येण्यात भाजपसह संघाचंही योगदान असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात दबक्या आवाजात सुरू आहे. त्यामुळे अजितदादा आपल्या भूमिकेवर ठाम राहणार की संघाचे निमंत्रण स्वीकारणार याकडे लक्ष लागलेलं आहे.आमची शाहू, फुले आणि आंबेडकर ही विचारधारा आम्ही सोडणार नाही म्हणत महायुतीत दाखल होऊनही अजित पवार आणि त्यांचे आमदार सरकारमध्ये सुरुवातीला थोडे फटकूनच वागत होते. त्यात फडणवीसांनीदेखील अजितदादांशी आमची असलेली युती नैसर्गिक नसून राजकीय असल्याचे म्हणत महायुतीतले राष्ट्रवादी काँग्रेसचे 'अवघडलेपण' अधोरेखित केले होते. मात्र, आता मंत्रिमंडळ विस्तार आणि हिवाळी अधिवेशनासाठी दाखल झालेल्या महायुतीच्या आमदारांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने भेटीचे निमंत्रण पाठवले आहे. पण आता यात अजितदादा आणि त्यांची राष्ट्रवादी काँग्रेस संघाच्या कार्यालयात जाणार की संघाचं निमंत्रण धुडकावणार याकडं सर्वांचेचं लक्ष लागलेले आहे.

# करुणेचा महासागर श्री संत गाडगेबाबा : श्रृंगारे महाराज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ अमरावती**

भुकलेल्यांची भुक समजणारे व भुक मिटवणारे, तहानल्यांची तहान भागवणारे यासाठी पाणेरी उभारणारे, निराश्रांतासाठी धर्मशाळा अशी दशसुत्री नुसती सांगून नाही तर प्रत्यक्षात दिनदुबळ्यांसाठी राबविणारे एकमेव संत गाडगेबाबा होत. अपार करुणेचा महासागर श्री संत गाडगेबाबा होते, अशी डेबुमहती हभप श्री शिवदास महाराज श्रृंगारे यांनी गाडगेबाबा नगर येथे विषद केली. ते श्री संत गाडगेबाबांचा ६८ वा पुण्यतिथी महोत्सव बाबांच्या समाधीस्थळी गाडगेबाबा नगर येथे सुरु आहे. संसारासाठी जगले तर म्हातारपणात मरण्याची वाट पाहते, राष्ट्रासाठी, समाजासाठी जगले तर जनता अमर करते,जगातल्या साधुंचा आदर्श म्हणजे श्री संत गाडगेबाबा. शिवदास महाराजांनी समाजातील विविध विषयांवर हात घालून संत चरित्र मांडले.


# अंबाडा येथे मारहाणीत एका युवकाचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ मोर्शी**

अंबाडा येथील बारमध्ये क्षुल्लक वादातून झालेल्या मारहाणीत एका युवकाचा मृत्यू झाल्याची घटना दि १६ डिसेंबर ला घडली. अमोल ताराचंद इंगळे वय ३६ रा. आष्टगाव असे मारहाणीत मृत पावलेल्या युवकाचे नाव आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहिती नुसार दि १४ डिसेंबर ला अमोल हा अंबाडा येथील एका बार मध्ये गेला होता तेथे समीर शहा नजीर शहा व त्याचे दोन मित्र असे तिघे बसले होते. यापैकी समीर शहा याने अमोल याला शिवीगाळ केली.दरम्यान अमोल हा काउंटरवर पैसे देण्यासाठी गेला असता समीर शहा याने अमोल च्या चेहऱ्यावर काचेचा ग्लास फेकून मारला तसेच खाली पाडून पोटात लाथा बुक्याने मारहाण केली.

या मारहाणीत अमोल याच्या पोटात गंभीर दुखापत झाली. तो घरी आला असता व पोटात दुखते असे त्याने सांगितल्याने घरच्यानी त्याला अंबाडा येथील दवाखान्यात नेले. डॉक्टरांनी त्याची गंभीर स्थिती पाहता सरकारी दवाखान्यात दाखल करण्याचा सल्ला दिला.



अमोल ची गंभीर हालत पाहता व अमोल याचे पोटात जास्त दुखु लागल्याने त्याच्या नातलगांनी त्याला उपचारा करीता ऍक्झान हॉस्पीटल अमरावती येथे दाखल केले. तिथे डॉक्टरांनी अमोलच्या पोटाची सोनोग्राफी करून त्याचे पोटाचे ऑपरेशन करण्यास सांगीतले व त्या करीता ०४ लाख रूपये खर्च येणार असे डॉक्टरांनी सांगीतले आहे. परंतु ऐवढा खर्च परवडणार नसल्याने त्याला शासकीय महाविद्यालय नागपुर येथे उपचारा करीता घेवुन गेले असता डॉक्टरांनी तपासुन तो मरण पावला असे घोषित केले.

याप्रकरणी मोर्शी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून चौकशी करीता तीनजणांना ताब्यात घेतल्याचे समजते. मोर्शी पोलीस पुढील तपास करीत आहे.

# नाना पटोले अध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची तयारीत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१७नागपूर**

विधानसभा निवडणुकीतील अपयशाची नैतिक जबाबदारी स्वीकारत आपल्या पदाचा राजीनामा देण्याची तयारी दर्शवली आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस समितीचे (एमपीसीसी) अध्यक्ष नाना पटोले यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. विधान भवन परिसरात पत्रकारांशी ते बोलत होते.



काँग्रेसचे वरिष्ठ नेते रमेश चेन्निथला लवकरच बैठक बोलावून नुकत्याच झालेल्या निवडणुकांतील पराभवाचे विश्लेषण करतील. यावेळी पटोले यांनी केंद्र सरकारच्या 'वन नेशन, वन इलेक्शन' प्रस्तावावरही तीव्र टीका केली. त्यांनी हा प्रस्ताव देशातील लोकशाही व्यवस्था खिळखिळी करण्याचा प्रयत्न असल्याचे म्हटले. शासन प्रणाली केंद्रीकृत करण्यासाठी आणि संघराज्य प्रणालीला कमकुवत करण्यासाठी हा प्रस्ताव राबवला जात आहे. संसाधन वाचवण्याच्या नावाखाली सरकार नागरिकांचे घटनात्मक अधिकार हिरावून घेण्याचा प्रयत्न करत आहे, असे पटोले म्हणाले.पटोले यांनी इशारा दिला की, या उपक्रमामुळे लोकशाही सहभाग आणि जबाबदारी यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. वन नेशन, वन इलेक्शन ही केवळ एकत्रित निवडणुकांपुरती मर्यादित कल्पना नाही; ती विविध आवाज दाबण्याची आणि राज्यांचा लोकशाही प्रक्रियेतला सहभाग कमी करण्याची पद्धत आहे, असे त्यांनी सांगितले.

सरकारकडून जनतेच्या समस्या सोडवण्याऐवजी राजकीय अजेंडा पुढे रेटण्यावर भर दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. या सरकारच्या योजनांमुळे देशाच्या संघराज्यात्मक लोकशाही व्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो, असे त्यांनी नमूद केले.

राजकीय पराभवानंतर काँग्रेसमधील नाराजी वाढत असताना पटोले यांनी राजीनामा देण्याची तयारी दाखवली असून पक्षाची आगामी आढावा बैठक ही पक्षाची धोरणे नव्याने उभारण्यासाठी महत्त्वाची ठरणार आहे. त्यांच्या 'वन नेशन, वन इलेक्शन'वरील टीकेमुळे विरोधकांचा देशाच्या राजकीय व लोकशाही भवितव्याबद्दलचा आक्रोशही प्रकर्षाने समोर आला आहे.

# खोटे ई-टॅग लावून कत्तलीसाठी गोवंश घेवून जाणाऱ्यांवर कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १७ धामणगाव रेल्वे**

पोलीस स्टेशन चांदुर रेल्वे हद्दीत खोटे ई टॅग लावून कत्तलीकरीता घेवून जाणाऱ्या गोवंशाच्या ऑटोला पोलीसांनी अटक केली. चांदुर रेल्वे पोलीस ठाण्यातंर्गत येणाऱ्या चिरोडी येथे नाकाबंदी दरम्यान ही घटना उघडकीस आली. सदर माहिती अमरावती येथील प्रख्यात गौरक्षक अजितपाल मोंगा यांनी दिली

धामणगावच्या गौरक्षण संस्थेमधून याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, चांदुर रेल्वे पोलीसांची नाकाबंदी सुरु असतांना जनावर मालक यानी आपण शेतकरी असल्याचे बतावणी केली. जनावर यांना ईटॅग असल्याने आणि खरेदी विक्री संबधीत सर्व पावत्या असल्याचे सांगण्यात आले.

सदर पावत्या चेक केल्यावर पावत्या कृषि उत्पन्न बाजार समिती मधील असल्याचे दिसून आल्या. जनावरांना असलेले टॅग हे ऑनलाईन चेक केले असता हे सर्व खोटे असल्याचे लक्षात आले. त्यामुळे ऑटोच्या चालक व बसलेल्या दोघांची चौकशी केली असता ८ मोठे व ४ लहान गोवंश या वाहनात कत्तलीकरीता घेवून जात असल्याचे निष्पन्न झाले. या वरून पोलीसांनी ७ आरोपींविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास चांदुर रेल्वे पोलीस करीत आहे.